# राष्ट्रीय महिला आयोग #

प्राचीन काळापासून भारत हा पुरुषप्रधान संस्कृती असलेला देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे महिलांना दुय्यम स्थान होते. परंतु २०-२१ शतकामध्ये महिलांशी संबंधित अनेक सुधारणा होऊ लागल्या. त्यामध्ये जागतिक महिला आयोग १९४६ मध्ये स्थापन करण्यात आला. १९७५ हे जागतिक महिला वर्ष तर १९७५-८६ हे जागतिक महिला दशक म्हणून जाहिर करण्यात आले. त्याचबरोबर ८ मार्च १९११ पासून ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे अशा अनेक गोष्टींचा प्रभाव पडून राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतल्यानुसार राष्ट्रीय महिला आयोग १९९० अधिनियमानुसार या आयोगाची स्थापना करण्यात आली.

# रचना →

* राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९० नुसार या आयोगाची स्थापना.

* स्थापना → ३१ जानेवारी, १९९२

* मुख्यालय → दिल्ली

* मंत्रालय → महिला व बालविकास मंत्रालय

* १ले अध्यक्ष → जयंती पटनाईक

* सध्याचे अध्यक्ष → रेखा शर्मा

* ५ वे अध्यक्ष → गिरिजा व्याय
* ६ वे अध्यक्ष → गिरिजा व्याय
* ८ वे अध्यक्ष → ललिता कुमार

* ब्रीदवाक्य → समान हक्क

* मासिक → राष्ट्र महिला (हिंदी व इंग्रजी)

* १ अध्यक्ष व ५ सदस्य → ६ सदस्यीय आयोग

* नेमणूक → राष्ट्रपती

* राजीनामा
* बडतर्फ
* सेवाशर्ती

} राष्ट्रपती

* कार्यकाल → ३ वर्ष

* पात्रता → समाज कार्य करणारे

* वेतन → २,५०,०००/-

# कार्ये →

१) घटनेत महिलांना दिलेले आरक्षण टिकवून ठेवणे किंवा त्या मध्ये वाढ करणे.

२) महिलांच्या हक्कांची गळचेपी होत असेल तर ते थांबवणे

३) महिला तुरुंगांना भेटी देऊन तेथे होणाऱ्या महिलांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडणे.

४) महिलांच्या समस्या केंद्र व राज्य सरकारच्या निदर्शनात आणून देणे.

५) महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी जलद गती न्यायालय स्थापन करणे.

६) राष्ट्र महिला या मासिकातून महिलांच्या समस्या व उपाययोजना याबाबतची माहिती प्रसारीत करणे.

७) महिलांना शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रामध्ये विकासासाठी मदत करणे.

८) भारतीय घटनेने महिलांना दिलेले अधिकार त्यांना मिळवून देणे.

९) महिलांच्या तक्रारि बाबतीत दिवाणी कोर्टाचे अधिकार वापरणे.